# वर्तमान विकासाभिमुख शहरे आणि सार्वजनिक सेवा - एक अध्ययन

**डॉ. दिपाली दि भावे**
इतिहास विभाग प्रमुख
विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट अँड कॉमर्स, नागपूर

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i1.59

---

**सारांश *(Abstract)* :**

*प्रस्तत शोधनिबंध हा विकासाभिमुख शहरांमधील उपलब्ध सार्वजनिक सेवा, पायाभूत संरचना तसेच त्यांच्यासमोरील आव्हानांचे विश्लेषणात्मक परीक्षण आहे. भारतात वेगाने होत असलेल्या शहरीकरण, औद्योगिक विस्तार आणि ग्रामीण-शहरी स्थलांतराच्या परिणामी अनेक विकासाभिमुख शहरे उदयास येत आहेत. या शहरांमध्ये पायाभूत सुविधा व सार्वजनिक सेवा अद्याप विकासाच्या प्रक्रियेत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश विकासाभिमुख शहरांमधील पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, विद्युतपुरवठा व सुरक्षा यांसारख्या सार्वजनिक सेवांची सद्यस्थिती अभ्यासणे तसेच त्यांच्याशी संबंधित सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय व पर्यावरणीय आव्हानांचे मूल्यांकन करणे हा आहे.*

*मुख्यतः हा अभ्यास वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीवर आधारित असून त्यामध्ये शासकीय अहवाल, धोरणात्मक दस्तऐवज, पुस्तके व संशोधन लेख अशा दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. या संशोधन निबंधामधून असे स्पष्ट होते की अनियोजित शहरीकरण, लोकसंख्येची झपाट्याने होणारी वाढ, प्रशासकीय समन्वयाचा अभाव आणि मर्यादित आर्थिक संसाधने यांचा सार्वजनिक सेवांच्या गुणवत्तेवर व समसमान उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होतो. यासोबतच स्मार्ट सिटी मिशनअंतर्गत ई-गव्हर्नन्स, स्मार्ट जलव्यवस्थापन, डिजिटल आरोग्य सेवा व इंटेलिजेंट ट्रॅफिक सिस्टीम यांसारख्या तंत्रज्ञानाधारित उपक्रमांच्या भूमिकेचेही विश्लेषण करण्यात आले आहे. या संशोधन पत्राचा निष्कर्ष असा आहे की सर्वसमावेशक शहरी नियोजन, सक्षम स्थानिक स्वराज्य संस्था, जनसहभाग, सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) तसेच पर्यावरण-संवेदनशील दृष्टिकोन यांच्या माध्यमातूनच विकासाभिमुख शहरांमधील सार्वजनिक सेवा प्रभावी, सर्वसमावेशक आणि शाश्वत बनविता येऊ शकतात.*

**बीजशब्द (Keywords) :** विकासाभिमुख शहरे, शहरीकरण, सार्वजनिक सेवा, स्मार्ट सिटी, शहरी प्रशासन

---

**प्रस्तावना :**

सभ्यतेच्या विकासाची केंद्रे म्हणून शहरे नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावत आली आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर शहरांची संख्या आणि आकारमान यामध्ये अभूतपूर्व वाढ झाली आहे. भारतामध्ये २१व्या शतकात शहरीकरणाचा वेग अधिकच वाढलेला दिसून येतो (Thapar 45). रोजगार, शिक्षण, आरोग्य सुविधा तसेच उत्तम

जीवनमानाच्या शोधात लोक मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर करत आहेत. या प्रक्रियेमुळे अनेक विकासाधीन शहरे अस्तित्वात आली आहेत.

विकासाभिमुख शहर म्हणजे असे शहरी क्षेत्र जिथे पायाभूत सुविधा, निवासव्यवस्था, औद्योगिक विकास, वाहतूक व्यवस्था तसेच सार्वजनिक सेवा अद्याप विकासाच्या टप्प्यात असतात. अशा शहरांमध्ये सार्वजनिक सेवांची कार्यक्षमता ही नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा निश्चित करणारी महत्त्वाची बाब ठरते (Sharma 62).

**उद्दिष्टे (Objectives) :**

1. विकासाधीन शहरांमधील सार्वजनिक सेवांच्या स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.
2. वेगवान शहरीकरण व लोकसंख्या वाढीचा सार्वजनिक सेवांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
3. सार्वजनिक सेवांशी संबंधित प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय आव्हानांची ओळख पटविणे.
4. स्मार्ट सिटी मिशनअंतर्गत तंत्रज्ञानाधारित सार्वजनिक सेवांच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे.
5. विकासाभिमुख शहरांमधील सार्वजनिक सेवांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाय सुचविणे.

**विकासाभिमुख शहर :**

**संकल्पना आणि प्रमुख वैशिष्ट्ये :**

**अ) झपाट्याने वाढणारी लोकसंख्या :** विकासाभीमूख शहरांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे लोकसंख्येतील तीव्र वाढ. रोजगार, शिक्षण तसेच उत्तम जीवनमानाच्या शोधात ग्रामीण भागातून आणि लहान शहरांमधून मोठ्या प्रमाणावर लोक शहरांकडे स्थलांतरण करतात. लोकसंख्येतील ही झपाट्याने होणारी वाढ शहरी संसाधने आणि सार्वजनिक सेवांवर मोठा ताण निर्माण करते, ज्यामुळे प्रशासनासाठी नियोजनबद्ध विकास ही मोठी आव्हानात्मक बाब ठरते.

**ब) तात्पुरत्या व कायमस्वरूपी निवास व्यवस्थेचे सह-अस्तित्व :** विकासाभीमूख शहरांमध्ये तात्पुरते निवास (झोपडपट्ट्या, कामगार वसाहती) आणि कायमस्वरूपी निवास (अपार्टमेंट्स, निवासी वसाहती) हे एकाच वेळी अस्तित्वात असतात. बांधकाम क्षेत्राशी संबंधित कामगार आणि निम्न उत्पन्न गट तात्पुरत्या निवासस्थानी राहतात, तर मध्यम व उच्च उत्पन्न गट कायमस्वरूपी इमारतींमध्ये निवास करतात. ही परिस्थिती शहरी असमानता आणि सामाजिक विभाजन स्पष्टपणे अधोरेखित करते.

**क) अपुरी किंवा विकासाधीन पायाभूत सुविधा :** विकासाभीमूख शहरांमध्ये रस्ते, जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, विद्युतपुरवठा आणि वाहतूक प्रणाली यांसारख्या पायाभूत सुविधा पूर्णतः विकसित झालेल्या नसतात. लोकसंख्या वाढीच्या तुलनेत या सुविधांचा विस्तार मंद गतीने होतो. परिणामी नागरिकांना मूलभूत सुविधांच्या

अभावाला सामोरे जावे लागते आणि शहरी जीवनमानाची गुणवत्ता प्रभावित होते.

**ड) नव्याने विकसित होणारी औद्योगिक व व्यापारी क्षेत्रे :** विकासाधीन शहरांमध्ये नवीन औद्योगिक क्षेत्रे, आय.टी. पारक्स, विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ) तसेच व्यापारी केंद्रांचा वेगाने विकास होतो. ही क्षेत्रे रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देतात; मात्र त्याचबरोबर निवास, वाहतूक आणि सार्वजनिक सेवांची मागणीही वाढवतात. या क्षेत्रांचा विकास संतुलित न झाल्यास शहरी अव्यवस्था निर्माण होण्याची शक्यता असते.

**इ) विकासाच्या टप्प्यातील प्रशासकीय रचना :** विकासाभीमूख शहरांमध्ये प्रशासकीय रचनेचाही विकास होण्याची प्रक्रिया सुरू असते. महानगरपालिका, विकास प्राधिकरणे आणि इतर शासकीय संस्था आपापल्या भूमिका निश्चित करीत असतात. स्पष्ट धोरणांचा अभाव, अनुभवी मानवी संसाधनांची कमतरता आणि संस्थात्मक समन्वय नसल्यामुळे प्रारंभिक टप्प्यात प्रशासकीय कार्यप्रणाली तुलनेने दुर्बल राहते. याचा परिणाम सार्वजनिक सेवांच्या अंमलबजावणीवर होतो.

विकासाभीमूख शहरे ही सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय संरचनांच्या विकासाची केंद्रे असतात (UN-Habitat). त्यांची वैशिष्ट्ये हे दर्शवितात की योग्य वेळी नियोजनबद्ध विकास, सक्षम प्रशासन आणि समावेशक धोरणांचा अवलंब केल्यास ही शहरे भविष्यात शाश्वत आणि समृद्ध शहरी केंद्रे बनू शकतात. भारतात नवी मुंबई, लवासा, अमरावती (आंध्र प्रदेश), नोएडा आणि गुरुग्राम ही विकासाधीन किंवा अलीकडे विकसित झालेल्या शहरांची महत्त्वाची उदाहरणे आहेत.

**विकासाभीमूख शहरांमध्ये सार्वजनिक सेवा :**

अर्थ, महत्व आणि स्थिती - विकासाभिमुख शहरांमधील या सार्वजनिक सेवा केवळ दैनंदिन जीवननिर्वाहासाठी आवश्यक नसून सामाजिक स्थैर्य आणि आर्थिक विकासाची भक्कम पायाभरणीही करतात (Sen 110). सार्वजनिक सेवा शहरी जीवनमानाची गुणवत्ता निश्चित करतात. या सेवा शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था नागरिकांना सामूहिक हिताच्या दृष्टीने उपलब्ध करून देतात. त्यामध्ये पुढील प्रमुख सेवांचा समावेश होतो —

**जलपुरवठा :**

जलपुरवठा ही शहराची जीवनरेषा मानली जाते. विकासाधीन शहरांमध्ये लोकसंख्येच्या वेगवान वाढीच्या तुलनेत जलस्रोतांचा आणि वितरण व्यवस्थेचा विकास अनेकदा अपुरा राहतो. भूजलावर अतिवलंब, पाइपलाइन जाळ्याची कमतरता तसेच पाण्याचे असमान वितरण यांमुळे जलटंचाईची समस्या निर्माण होते.

**स्वच्छता व सांडपाणी व्यवस्था (Sanitation and Sewerage) :**

स्वच्छता व्यवस्था व सांडपाणी निचरा प्रणाली ही सार्वजनिक आरोग्याची मूलभूत आधारशिला आहे.

विकासाधीन शहरांमध्ये सांडपाणी जाळयाचा अभाव, उघडी गटारे आणि घनकचऱ्याची अयोग्य विल्हेवाट ही सामान्य समस्या आढळते. यामुळे संसर्गजन्य आजारांचा प्रसार होतो तसेच पर्यावरण प्रदूषणात वाढ होते.

**आरोग्य सेवा** :

विकासाभिमुख शहरांमध्ये आरोग्य सेवा मर्यादित व असमान स्वरूपाच्या असतात. प्राथमिक आरोग्य केंद्रे, रुग्णालये तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना, विशेषतः स्थलांतरित कामगारांना, अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. सुलभ, सक्षम व सर्वसमावेशक आरोग्य सेवा शहरी स्थैर्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**शिक्षण (Education) :**

शिक्षण हे शहराच्या सामाजिक विकासाचे प्रमुख साधन आहे. विकासाभिमुख शहरांमध्ये खासगी शैक्षणिक संस्थांची संख्या अधिक असून शासकीय शाळांची संख्या तुलनेने कमी असते. परिणामी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता मर्यादित होते.

**सार्वजनिक परिवहन :**

सार्वजनिक परिवहन हे शहरी गतिशीलता आणि पर्यावरणीय संतुलन राखण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. विकासाधीन शहरांमध्ये अपूर्ण रस्ते, मर्यादित बस किंवा मेट्रो सेवा यांमुळे नागरिक खासगी वाहनांवर अधिक अवलंबून राहतात. याचा परिणाम म्हणून वाहतूक कोंडी व वायुप्रदूषण वाढते.

**विद्युतपुरवठा :**

विद्युतपुरवठा हा शहरी जीवनमान आणि औद्योगिक विकासासाठी अनिवार्य घटक आहे. विकासाधीन शहरांमध्ये वीज वितरण व्यवस्था अस्थिर असल्यामुळे वारंवार वीजखंडित होणे व असमान पुरवठा या समस्या उद्भवतात. विश्वासार्ह विद्युत व्यवस्थेशिवाय स्मार्ट व शाश्वत शहराची संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकत नाही.

**सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन :**

सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन ही शहराच्या संवेदनशीलतेची व तयारीची द्योतक असतात. विकासाधीन शहरांमध्ये पोलीस व्यवस्था, अग्निशमन सेवा व आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अनेकदा अपुरी असते. नैसर्गिक आपत्ती, आग, अपघात व गुन्हेगारी घटनांना तोंड देण्यासाठी संघटित, सक्षम आणि जलद प्रतिसाद प्रणाली असणे आवश्यक आहे.

**अद्यावत सार्वजनिक सेवांशी संबंधित प्रमुख आव्हाने :**

विकासाभीमूख शहरांमधील सार्वजनिक सेवांसमोरील प्रमुख आव्हाने पुढीलप्रमाणे आहेत —

**अ) अनियोजित शहरीकरण :**

अनियोजित शहरीकरण ही सार्वजनिक सेवांसमोरील सर्वात मोठी आव्हानात्मक समस्या आहे. लोकसंख्येतील वाढ, ग्रामीण–शहरी स्थलांतर आणि औद्योगिक विस्तार यांमुळे शहरांचा विकास पूर्वनियोजनाविना होतो. परिणामी निवास व्यवस्था, जलपुरवठा, स्वच्छता, वाहतूक व आरोग्य सेवा वाढत्या लोकसंख्येच्या ताणाला तोंड देऊ शकत नाहीत. अनियोजित वसाहती आणि बेकायदेशीर बांधकामांमुळे सार्वजनिक सेवांच्या वितरणात असमानता निर्माण होते तसेच शहरी जीवनमानाची गुणवत्ता बाधित होते.

**ब) वेगवान शहरीकरण :**

अत्यंत वेगाने होत असलेले शहरीकरण सार्वजनिक सेवांच्या क्षमतेपेक्षा अधिक मागणी निर्माण करते. नव्याने विकसित होत असलेल्या शहरांमध्ये मूलभूत पायाभूत सुविधा पूर्ण विकसित होण्यापूर्वीच मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती वाढते. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि विद्युतपुरवठा यांसारख्या सेवा अपुऱ्या ठरतात. ही परिस्थिती शहरी अव्यवस्था, प्रदूषण आणि सामाजिक तणाव वाढविण्यास कारणीभूत ठरते.

**क) प्रशासकीय समन्वयाचा अभाव :**

विकासाधीन शहरांमध्ये सार्वजनिक सेवांचे संचालन विविध शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर एजन्सी यांच्या माध्यमातून केले जाते. मात्र त्यांच्यातील प्रभावी समन्वयाचा अभाव योजनांच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण करतो. धोरणांची पुनरावृत्ती, जबाबदाऱ्यांचे अस्पष्ट विभाजन आणि निर्णय प्रक्रियेतील विलंब यांमुळे सार्वजनिक सेवांची गुणवत्ता कमी होते.

**ड) आर्थिक संसाधनांची मर्यादा :**

सार्वजनिक सेवांचा विस्तार व देखभाल यासाठी पर्याप्त आर्थिक संसाधने आवश्यक असतात. विकासाभीमूख शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न मर्यादित असते, तर गरजा अत्यंत मोठ्या असतात. केंद्र व राज्य सरकारांवरील अवलंबित्व, करसंकलनातील कमजोरी आणि अपुरा अर्थसंकल्प यांमुळे सार्वजनिक सेवांचा विकास मंदावतो.

**इ) सामाजिक असमानता व झोपडपट्ट्यांचा विस्तार :**

विकासाभीमूख शहरांमध्ये सामाजिक व आर्थिक असमानता प्रकर्षाने दिसून येते. एका बाजूला आधुनिक निवासी व व्यापारी क्षेत्रांचा विकास होत असताना, दुसऱ्या बाजूला झोपडपट्ट्यांचा वेगाने विस्तार होतो. या भागांतील रहिवाशांना स्वच्छ पाणी, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत सार्वजनिक सेवांपर्यंत मर्यादित प्रवेश मिळतो. ही असमानता सामाजिक बहिष्करण आणि शहरी दारिद्र्य वाढवते.

**ई) पर्यावरणीय ऱ्हास :**

अनियंत्रित बांधकाम, औद्योगिकीकरण आणि वाढती लोकसंख्या यांमुळे पर्यावरणीय ऱ्हास ही गंभीर

समस्या बनली आहे. वायू, जल व भूमी प्रदूषणामुळे सार्वजनिक सेवांवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. जलस्रोतांचे क्षय, हरित क्षेत्रांची घट आणि हवामान बदलाशी संबंधित आव्हाने शहरी जीवन अस्थिर करतात तसेच शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमध्ये अडथळे निर्माण करतात.

वरील आव्हाने हे स्पष्ट करतात की विकासाभीमूख शहरांमधील सार्वजनिक सेवा केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय प्रश्न नसून त्या सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय घटकांशी घनिष्ठपणे संबंधित आहेत (Sharma 118). या समस्यांचे निराकरण सर्वसमावेशक शहरी नियोजन, सक्षम प्रशासन, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक समावेशन यांच्या अभावात शक्य नाही. अनेकदा विकासाधीन शहरांमधील योजना लोकसंख्या वाढीच्या प्रत्यक्ष गतीपेक्षा मागे राहतात, ज्यामुळे सार्वजनिक सेवांवर अत्यधिक दबाव निर्माण होतो.

**स्मार्ट सिटी आणि अद्ययावत सार्वजनिक सेवा :**

भारत सरकारच्या स्मार्ट सिटी मिशन योजनेचा उद्देश विकासाभिमुख तसेच विकसित होत असलेल्या शहरांमध्ये तंत्रज्ञानाधारित सार्वजनिक सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. भारत सरकार (Government of India) या अंतर्गत खालील प्रमुख सार्वजनिक सेवांचा समावेश होतो —

**1. ई-गव्हर्नन्स (E-Governance) :**

ई-गव्हर्नन्सचा मुख्य उद्देश माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासकीय सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावी बनवणे हा आहे. निर्माणाधीन शहरांमध्ये जन्म–मृत्यू नोंदणी, कर भरणा, तक्रार निवारण तसेच विविध प्रमाणपत्र सेवा ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध झाल्यामुळे वेळ, खर्च आणि भ्रष्टाचारात घट होते तसेच नागरिकांचा सहभाग वाढतो.

**2. स्मार्ट जल व्यवस्थापन (Smart Water Management) :**

स्मार्ट जल व्यवस्थापनामध्ये सेन्सर्स, डिजिटल मीटरिंग आणि डेटा तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पाणीपुरवठा व जलसंधारण केले जाते. निर्माणाधीन शहरांमध्ये ही प्रणाली जलसंकट कमी करण्यास, पाण्याच्या गळतीवर नियंत्रण ठेवण्यास, पावसाचे पाणी साठवण्यास आणि जलसंपत्तीचा शाश्वत वापर सुनिश्चित करण्यास उपयुक्त ठरते.

**3. डिजिटल आरोग्य सेवा (Digital Health Services) :**

डिजिटल आरोग्य सेवांमध्ये टेलिमेडिसिन, ई-हेल्थ रेकॉर्ड आणि मोबाईल आरोग्य अप्स यांचा समावेश होतो. निर्माणाधीन शहरांमध्ये मर्यादित आरोग्य सुविधा असतानाही या सेवांमुळे नागरिकांना सुलभ, त्वरित आणि परवडणारी वैद्यकीय मदत उपलब्ध होते.

**4. इंटेलिजेंट ट्रॅफिक सिस्टीम (Intelligent Traffic System) :**

इंटेलिजेंट ट्रॅफिक सिस्टीम ही तंत्रज्ञानाधारित वाहतूक व्यवस्थापन प्रणाली असून त्यामध्ये स्मार्ट सिग्नल,

सीसीटीव्ही आणि रिअल-टाइम डेटाचा वापर केला जातो. या प्रणालीमुळे वाहतूक कोंडी, इंधनाचा अपव्यय आणि प्रदूषण कमी होऊन शहरी वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होते.

तंत्रज्ञानाधारित सार्वजनिक सेवा आधुनिक शहरी विकासाची अपरिहार्य गरज बनल्या आहेत. ई-गव्हर्नन्स, स्मार्ट जल व्यवस्थापन, डिजिटल आरोग्य सेवा आणि इंटेलिजेंट ट्रॅफिक सिस्टीम या केवळ सार्वजनिक सेवांची गुणवत्ता सुधारत नाहीत, तर शासन आणि नागरिकांमधील विश्वासही दृढ करतात. तथापि, या प्रणालींचे यश डिजिटल साक्षरता, समान उपलब्धता आणि प्रभावी अंमलबजावणी यांवर अवलंबून असते. तसेच, अनेक वेळा स्मार्ट सिटी प्रकल्पांचे लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नसल्याचेही आढळून येते.

**उपाययोजना :**

**1. समग्र शहरी नियोजन :**

विकासाभिमुख शहरांमधील सार्वजनिक सेवांशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी दीर्घकालीन आणि एकात्मिक शहरी नियोजन आवश्यक आहे. यामध्ये गृहनिर्माण, वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता, ऊर्जा तसेच सामाजिक पायाभूत सुविधांचा समन्वित विकास अपेक्षित आहे.

**2. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सशक्तीकरण :**

महानगरपालिका, नगरपालिका व पंचायत संस्थांना पर्याप्त प्रशासकीय अधिकार, आर्थिक संसाधने आणि तांत्रिक क्षमता प्रदान करून सार्वजनिक सेवांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

**3. संस्थात्मक सुदृढीकरण :**

पाणीपुरवठा, वाहतूक, आरोग्य इ. सेवांशी संबंधित संस्थांना आधुनिक व्यवस्थापन प्रणाली आणि प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास सेवा गुणवत्ता, पारदर्शकता आणि जबाबदारीत वाढ करता येऊ शकते.

**4. जनसहभागाला प्रोत्साहन :**

शहरी विकासाच्या योजना तयार करताना आणि त्यांच्या अंमलबजावणीत नागरिकांचा सक्रिय सहभाग असल्यास सार्वजनिक सेवा अधिक प्रभावी, उत्तरदायी आणि लोकाभिमुख बनतात.

**5. सार्वजनिक–खाजगी भागीदारी (PPP) मॉडेल :**

आर्थिक व तांत्रिक मर्यादा दूर करण्यासाठी सार्वजनिक–खाजगी भागीदारीच्या माध्यमातून पाणीपुरवठा, वाहतूक, ऊर्जा आणि गृहनिर्माण अशा सेवांमध्ये गुंतवणूक व नवोन्मेषाला चालना देता येते.

**6. पर्यावरण-संवेदनशील विकास :**

नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण, हरित क्षेत्रांचा विस्तार आणि प्रदूषण नियंत्रणावर आधारित विकास सार्वजनिक सेवांची दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करतो.

**7.समानता आणि समावेशन :**

सार्वजनिक सेवांपर्यंत समाजातील सर्व घटकांना—विशेषतः वंचित व दुर्बल गटांना—समान प्रवेश सुनिश्चित करून समावेशक आणि न्याय्य शहरी विकासाला प्रोत्साहन देणे अत्यावश्यक आहे.

वरील उपाययोजना आणि सूचना स्पष्ट करतात की विकासाभिमुख शहरांमधील सार्वजनिक सेवांच्या आव्हानांचे निराकरण केवळ तांत्रिक उपायांनी शक्य नाही, तर समग्र, सहभागी आणि पर्यावरण-जागरूक दृष्टिकोनातूनच ते साध्य होऊ शकते. या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास विकासाभिमुख शहरांमधील सार्वजनिक सेवांची गुणवत्ता सुधारेल आणि ही शहरे शाश्वत व मानव-केंद्रित शहरी विकासाची आदर्श उदाहरणे ठरू शकतील.

**निष्कर्ष :**

विकासाभिमुख शहरे ही आधुनिक विकासाची एक अनिवार्य गरज आहेत; मात्र त्यांचे यश या गोष्टीवर अवलंबून आहे की त्या शहरांमध्ये सार्वजनिक सेवा कितपत प्रभावी, समावेशक आणि शाश्वत स्वरूपात उपलब्ध आहेत. सार्वजनिक सेवांकडे दुर्लक्ष झाल्यास ही शहरे सामाजिक असंतोष, पर्यावरणीय संकट तसेच प्रशासकीय अपयशाची केंद्रे बनण्याची शक्यता असते. म्हणूनच निर्माणाधीन शहरांच्या विकास प्रक्रियेत सार्वजनिक सेवांना केंद्रस्थानी स्थान देणे अत्यंत आवश्यक आहे.

**Works Cited (MLA 9) :**


- Bhagat, R. B. Urban Migration Trends, Challenges and Opportunities in India. Oxford UP, 2018.
- Government of India. Smart Cities Mission: Statement and Guidelines. Ministry of Housing and Urban Affairs, 2023. www.smartcities.gov.in
- Sen Amartya, "Urban Development and Public Policy". Economic and Political Weekly. Vol. 45 no.12, 2010, pp. 105-118
- Sharma R.K. Urbanization and Public Administration, Rajkumar Prakashan,2015
- Thapar, Romila. Early India : From thr origins to A D 1300 ,Penguin India 2003.
- UN-Habitat, World Cities Report, United Nations Human Settlements Programme,

2022.

**संदर्भ ग्रंथ (References) :**


- रामचंद्र गुहा – भारत का सामाजिक इतिहास, न्यू दिल्ली पेंगविन, इंडिया, 2010.
- बी.डी. चट्टोपाध्याय – शहरीकरण और भारतीय समाज, न्यू दिल्ली,ऑक्सफोर्ड यूनिवर्सिटीप्रेस, 2003.
- बी. डी. चट्टोपाध्याय. शहरीकरण और भारतीय समाज. नई दिल्ली: ऑक्सफोर्ड यूनिवर्सिटी प्रेस, 2003.
- शर्मा, रामशरण. शहरीकरण और भारतीय समाज. नई दिल्ली: राजकमल प्रकाशन।
- वर्मा, प्रमोद कुमार. शहरी विकास और नगर प्रशासन. जयपुर: पुस्तक महल।
- Guha, Ramachandra. India After Gandhi: A History of the World's Largest Democracy (भारतीय सामाजिक इतिहास). New Delhi: Penguin India, 2010.
- Singh, K. N. Urbanization in India (भारत में शहरीकरण). New Delhi: Rawat Publications.
- Srinivas, M. N. Social Change in Modern India. New Delhi: Orient Longman, 1966.
- Loksatta (Newspaper). 06 January 2026.
- Government of India. Smart Cities Mission Report. Ministry of Housing and Urban Affairs, New Delhi: Government of India, 2015.
- भारत सरकार (Government Reports – Hindi)
- भारत सरकार. भारत में शहरी विकास रिपोर्ट. नई दिल्ली: योजना आयोग / नीति आयोग।
- भारत सरकार. स्मार्ट सिटी मिशन: दिशा-निर्देश एवं प्रगति रिपोर्ट. नई दिल्ली: आवासन एवं शहरी कार्य मंत्रालय।
- United Nations Human Settlements Programme (UN-Habitat). World Cities Report.
- Nairobi: United Nations, 2016.
- W / Web Source
  https://www.newsnation

  i. # IndoreContaminatedWaterdeaths